# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक २५/०९/२०१७

आज दिनांक २५/०९/२०१७ रोजी उपविभाग एटापल्ली अंतर्गत योणाऱ्या पोमके गट्टा (जां) हद्दीतील कोठी रोडवर नक्षल्यांनी क्लेमोर माईन स्फोट घडवून आणला. पोलीसांना इजा करण्याच्या दृष्टिने नक्षल्यांनी सदर स्फोट घडवून आणला. परंतू यामध्ये कोणतीही हानी झाली नाही.

विशेष अभियान पथक गडचिरोली, क्युआरटी एटापल्ली, गट्टा (जां) पोस्ट पार्टी व सीआरपीएफ हे संयुक्तपणे एरिया सर्चिंग करीत असतांना आज नक्षल्यांनी पेरुन ठेवलेला क्लेमोर माईनचा स्फोट झाला. यामध्ये कोणतीही हानी झाली नाही.

याचबरोबर काल दिनांक २४/१०/२०१७ रोजी  भामरागड तालुक्यातील कोठी हद्दीतील पडोर जंगल परीसर व एटापल्ली तालुक्यातील गिलंगुडा व झारेवाडा जंगल परीसरामध्ये पोस्ट पार्टी व सीआरपीएफ संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना पोलीस नक्षल चकमक उडाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. चकमकी दरम्यान पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी जंगलाचा फायदा घेवून पळून गेले. जिल्हयात सर्वत्र नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.